जा.क्र.नांवाशमनपा/नसका/**CR- / 80** /2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक-:21.11.2014

## दि.24.11.2014 रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.1**

श्री आनंद बाबुराव कांबळे-निलंगेकर, लिपीक , मनपा नांदेड रा. रमाबाई हाऊसिंग सोसायटी नांदेड यांनी दि.07.11.2014 रोजी अर्ज सादर केला आहे.

संबंधीतांनी त्यांचा मुलगा चिरंजीव सत्येंद्र आनंद कांबळे हा दिनांक 17.08.2014 रोजी हैद्राबाद येथे P G COURSE IN EMBEDDED SYSTEM या अभ्यासक्रमाची परिक्षा देऊन नांदेडकडे परत येत असतांना उमरी रेल्वे स्टेशन येथे अपघात होऊन त्याचे दोन्ही पाय कापले गेले आहेत. डॉक्टरांच्या सल्यानुसार त्याला चालण्यासाठी कृतिम पाय बसविणे आवश्यक आहे. सदर अपघातात झालेल्या शारिरीक विकलागता व ऑपरेशन इत्यादी पोटी अदांजीत रक्कम रुपये 2,25,000/- झाला असुन कृत्रिम पाय बसविण्यासाठी अबोव नी व बीलो नी अशा दोन्ही पायाकरिता रु.3,00,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. परिस्थिती हालाखिची असल्याने उसनवारी करून वैद्यकीय खर्च भागविण्यात आलेला आहे.

तरी शारिरीक विकलांगता यावरील शस्त्रक्रिया व औषधोपचाराकरिता तसेच कृत्रिम पाय बसविण्याकरिता रु.5,25,000/- इतके आर्थिक सहाय्य देण्याची विनंती केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कायमस्वरुपी कायम कर्मचा-यांना वैद्यकीय प्रतीपुर्तीचा लाभ अनुज्ञेय नाही.

तथापि महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्र.15 दि.24.05.2005 व्दारे मंजुर उपविधीच्या अनुषंगाने मनपा ठराव क्र.108 दि.21.08.2013 व्दारे कर्मचारी कल्याण निधीमधील तरतुदीनुसार महानगरपालिकेतील कर्मचा-यांना त्यांच्या कुटूंबियांना पुढिल नमुद प्रसंगी कार्यकारी समीतीच्या मान्यतेने आर्थिक मदत देण्यात येते.

अ) अपघात झाल्यास कायम अपंगत्व आल्यास अनुदान रुपये 10,000/-

ब) अचानक मृत्यू झाल्यास अनुदान 10,000/-

क) आजारी असल्यास त्यात दुर्धर आजारा करीता जसे कॅन्सर, हृदयविकार, अर्धांगवायू, ब्रेनहयामरेज व त्या अनुषंगाने

मोठी शस्त्रक्रिया करावयाची असल्यास जास्तीत जास्त खर्च रुपये 10,000/- आर्थिक मदत अनुज्ञेय राहील.

ड) मुलांच्या उच्च शिक्षणासाठी परत फेडीच्या तत्वावर 3% व्याजदराणे कर्ज रु.25,000/-

उपरोक्त तरतुद पाहता कर्मचारी कल्याणनिधी मधुन जास्तीत जास्त रुपये 10,000/- आर्थिक मदत कर्मचारी कल्याणसमितीच्या मान्यतेने देता येत नाही, परंतु सबंधित कर्मचा-यांच्या पाल्याचे अपघाताचे स्वरुप व त्यावरील उपचार यासाठी लागणारा खर्च लक्षात घेता, सदर बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

करिता श्री आनंद बाबुराव कांबळे लिपीक मनपा नांदेड यांचा मुलगा सत्येंद्र आनंद कांबळे यांच्या शारिरीक विकलांगता शस्त्रक्रिया तसेच कृत्रिमपाय बसविण्यासाठी संबंधितास रुपये 5,25,000/- इतके आर्थिक सहाय्य देण्यासाठी मान्यतेस्त्व प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्र.2**

**विषय -: खालील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करणे बाबत.**

सदर्भः-1) महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो/१३१२- प्र.क्रं /30.पुर्नबांधीत-११/1-अ , मंत्रालय ,मुंबई दिनांक12.02.2013.

2) श्री एस.जे.माने ,पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड यांचे फॅक्स संदेश क्रं.सापळा केस/असीबी/नांदेड 3508/दिनांक02.10.2014.

(3) श्री एस.जे.माने ,पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड यांचे पत्र क्रं 2014 /3585. दिनांक08.10.2014.

(4) कार्यालयीन आदेश क्रं.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था14/13640/5- दिनांक 28.10.2014.

पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड यांनी तक्रारदार श्री मोहमद इरशादोदीन खाजा मशीयोदीन ,खाजगी गुत्तेदार ,रा.रहेमत नगर ,देगलुर नाका ,नांदेड यांच्या तक्रारीवरुन तक्रारदार यांनी गुलजार बाग ,नांदेड येथे केलेल्या सिमेंट कॉन्क्रीट रोडच्या बांधकामाचे 10 लाख) अक्षरी रुपये दहा लक्ष (रुपयांचे सादर केलेले बिल मंजूर करुन देण्यासाठी शहर अभियंता श्री माधव शंकरराव

बाशेट्टी यांना विनंती केली असता सदर कामासाठी त्यांनी तक्रारदार यांचेकडे 25 हजार) अक्षरी रुपये पंचवीस हजार (रुपयांच्या लाचेची मागणी केली तेंव्हा तक्रारदार यांनी काम होणार नाही म्हणून नाईलाजाने होकार दिला व अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड कार्यालयात हजर होवून तक्रार दिल्यावरुन श्री माधव शंकरराव बाशेट्टी ,शहर अभियंता ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचेविरुध्द दिनांक 01.10.2014. रोजी सापळा रचुन सदरच्या सापळा कार्यवाहीमध्ये श्री माधव शंकरराव बाशेट्टी ,शहर अभियंता यांनी २५ हजार) अक्षरी रुपये पंचवीस हजार (रुपये लाचेची मागणी करुन स्वत :स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व संबंधितांविरुध्द करण्याचे तपासकामी दि 02.10.2014.रोजी 6.20 वाजता त्यांना अटक केली असुन त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम)(1)13 ,7 ड (सह (2)13 अन्वये िदिलेल्या सरकारतर्फे फिर्यादीवरुन पोलिस ठाणे वजिराबाद येथे दिनांक 02.10.2014.रोजी गुन्हा दाखल करण्यात आला व 6.20 वाजता संबंधितास अटक केले असल्याचे संदर्भिय पत्र या कार्यालयास सादर केले आहे.

त्यांनतर दिनाक ०२.१०.२०१४.रोजी मा.विशेष न्यायालय नांदेड यांचे समक्ष हजर करुन 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी मिळणेस विनंती केली असता मा.न्यायालयाने दि 16.10.2014.पर्यंत संबंधितास न्यायालयीन कोठडी मंजूर करुन नंतर जामीनावर मुक्त केले आहे .तसेच पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड यांनी संदर्भ क्रं 3.च्या पत्राद्वारे या कार्यालयास आरोपी लोकसेवक श्री माधव शंकरराव बाशेट्टी यांचेवर महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं.अभियो/1312-प्र.क्रं/30.पुर्नबांधीत--11/1अ ,मंत्रालय ,मुंबई दिनांक 12.02.2013.या शासन निर्णयातील खंड)9 क (मध्ये नमुद केल्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन त्यांच्या कार्यालयास अवगत करण्याची विनंती केली आहे.

तथापि ,पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो ,नांदेड यांच्या पत्रानुसार व महाराष्ट्र शासनाच्या सदरील शासन निर्णयातील खंड )9क (मध्ये लाचेचा सापळा प्रकरणी) मानीव निलंबन वगळता (लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी /कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-याने करावी ,अशी तरतुद आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम)(१) 56 ब (मध्ये आयुक्त ,प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परीवहन अधिकारी वगळून ,महानगरपालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या असा कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिकेचा आदेश होईतोपर्यंत निलंबित करु शकेल व अशाप्रकारे निलंबित करण्यात आलेला अधिकारी हा असा परीवहन व्यवस्थापक किंवा कलम 45 अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे निलंबन व त्यासंबंधिची कारणे आयुक्ताने ताबडतोब महानगरपालिकेस कळविले पाहीजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासुन सहा महिण्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्ठात येईल ,अशी तरतुद आहे.

संदर्भिय शासन निर्णय ,पोलिस निरीक्षक ,अन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे पत्र व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुद विचारात घेवून श्री माधव शंकरराव बाशेट्टी ,शहर अभियंता ,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांची कलम 45 अन्वये पदोन्नतीने शहर अभियंता या पदावर नियुक्ती झालेली असल्यामुळे व त्यांना लाचेच्या सापळा प्रकरणात २५ हजार ) अक्षरी रुपये पंचवीस हजार (रुपये लाच स्विकारताना रंगेहाथ पकडून त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम(1)13 ,7 ) ड (सह (2)13अन्वये गुन्हा दाखल करण्यात असल्याने व संबंधितास अटक केले असल्याने त्यांना संदर्भ क्रं 4.च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे .सदरील निलंबनाचा आदेश कायम होणेसाठी मान्यतेस्तव प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येतो.

**विषय क्र. 3**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम 2006(2007 चा महा.अधियिम क्र.3) मधील कलम 11 मधील पोट कलम (3) नुसार प्राधिकरणास या प्रकरणाच्या अन्य तरतुदीच्या अधिन राहून,वेळोवेळी ,वार्षिक फीसहचा दर वाढविता येईल आणि असा वाढविलेला दर, वेळोवेळी कमी करता येईल व अशा कमी केलेल्या दराने फी आकारता येईल ,असे असले तरी कोणत्याही बाबतीत हा दर उक्त अनुसूची मध्ये विर्निदिष्ट केलेल्या किमान दरापेक्षा कमी करण्यात येणार नाही असे नमूद केल्यानूसार मिश्र स्वरुपात बाधण्यात येणा-या इमारती करीता खालील प्रमाणे फीस आकारणे योग्य राहिल.

तळमजला वाणिज्य वापर अधिक इतर मजले रहिवास वापर अशा इमारतीचे फक्त तळमजल्यावरील वाणिज्य बांधीव क्षेत्र 500 चौ.मि.पेक्षा जास्त नाही असे क्षेत्र व्यापालेल्या अशा मिश्र भोगवटा इमारतीच्या वाणिज्य बांधवी क्षेत्रफळासाठी रु.15/- (अक्षरी रु.पंधरा फक्त)चौ.मि. अग्ननीश्मन सेवा फी व त्यावरील रहिवास भोगवटाक्षेत्रफळासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मनपा विशेष सभा दि.14.8.2013 ठराव क्र.70 नुसार मा.आयुक्त यांचे आदेश क्र.नावाशमनपा /अअसे/366/2013 दि.26.9.2013 अन्वये रहिवासी इमारती करीता तात्पुरते ना हरकत प्रमाणपत्र शुल्क रु.3500/-(अक्षरी रु.तिन हजारपाचशे फक्त) अशी दोन्ही मिळून होणरी एकूण रक्कम आकारणे बाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर

**विषय क्र. 4** **प्रस्ताव**

राज्यात मोठया प्रमाणात डेग्युची लागण झालेंली असून नांवामनपा हध्दीतही डेंगूचे रुग्ण आढळून आलेले असल्यामूळे त्यावर करण्यात येणा-या उपाय योजनेची माहिती देवून डेंगु रुग्नांना वैद्यकिय सेवा उपलब्द करुन देणे संबंधी चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक ः- अनुजा तेहरा** **अनुमोदकः - स.विरेंद्रसिंघ गाडीवाले**

**विषय क्र. 5** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मंजुर सुधारीत विकास आराखडयातील आरक्षण क्र.सी-14, सी-15,सी-16, हे विकसित करण्यासाठी सदरील जागेचे भूसंपादन करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

**सुचक ः- स.विरेंद्रसिंघ गाडीवाले** **अनुमोदकः - अनुजा तेहरा**

**विषय क्र. 6** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये दरवर्षी काही ना काही धार्मिक कार्यक्रम सर्व समाजाचे होतात व त्या करीता त्या कार्यक्रमाची माहिती होण्यासाठी जाहिरात बॅनर लावण्यात येतात .त्या धार्मिक कार्यक्रमाच्या जाहिराती बॅनरला कसलयाही प्रकाराचा कर लावु नये व ते जाहिरात कर माफ करावे कारण सर्व धर्मांचे लोक धार्मिक कार्यक्रम साजरा करतात त्यास महापालिकेने जाहिरात कर लावु नये .करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचकः -सौ.पुष्पाताई राजेश शर्मा** **अनुमोदकः -धबाले गणपत गुणाजी**

**विषय क्रं. 7** **प्रस्ताव**

कै. बानो एज्युकेशन अॅंड वेल्फेअर सोसायटी नांदेड मुंबई विश्वस्थ अधिनियम 1950 व संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत नोंदणीकृत संस्था आहे अर्जदार संस्थेस महाराष्ट्र शासनाने अल्पधार्मिक, अल्पभाषिक व अल्पसंख्यांक म्हणुन मान्यता प्रदान आहे सदरील संस्थेव्दारे देगलुर नागा, नांदेड हया अल्पसंख्यांक बहुल परिसरात कै. वसंतराव काळे वरिष्ठ महाविद्यालय देगलुर नाका नांदेठ हे महाविद्यालय चालविल्या जात आहे संस्थेच्या नोंदणी, शासनाव्दारा अल्पसंख्यांक दर्जा प्रदान केलेले आहे तसेच महाविद्यालय सुरु करण्या करिता शासनाने प्रदान मान्यता आहे तसेच या संस्था संचलित महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखेचे पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात. या अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात 10 ते 12 किलोमिटर पर्यंत कोणतेही मानयता प्राप्त महाविद्यालय उपलब्ध नसल्याने सदरील महाविद्यालयात अतिदारिद्रय देषेखालील व आर्थीक दुर्बल घटकातील विद्यार्थी अल्यामुळे तसेच संस्थेस शासनाने मान्यता व्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थीक सहाय्यता नाही.

तरी सदरील भागात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची मौजे नांदेड येथे गट क्रं. 169 ची एक हेक्टर 93 आर जमीन पैकी 2 एकर यापुर्वी महाराष्ट्र अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृहास देण्यात आलेली होती. परंतु अल्पसंख्याक आयोगास स्थान निश्चयन बरोबर न वाटल्याने सदर जमीन अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृहास आयोगाने धेतली नाही. सदर जमीन देगलुर नाका नांदेड परिसरात असुन नांदेड महानगरपालिकेने शैक्षणिक उपक्रम करिता स्थान निश्चीत होते. तरी सदर जमीन देगलुर नाका नांदेड परिसरात रिकामी असून सभोवताली वास्तव्य करणारे रहिवाशी मालमत्तेचा दुरुपयोग करण्याची शक्यता येत नाही किंवा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करु शकतात. अर्जदार संस्थेस या जमिनीची अति आवश्यकता असून सदरी जमिनीची उपयुक्तता अल्पसंख्यांक समाजाच्या शिक्षण हित व मुलभूत शैक्षणिक गरजा पूर्ण करण्या करिता प्रभावजी नियोजन असल्यामुळे या बाबींचा विचार करून अर्जदार संस्थेस गट क्रं. 169 पैकी 80 आर जमीन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ग) अन्वये महानगरपालिकेच्या जमीन भाडेपट्टीवर देणे संबंधीत तरतुद आहे त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे रिकामी जागा नाममात्र भाडेतत्वावर देऊन नियमातील तरतुदीनुसार शासनाची मान्यता गृहीत धरुन देणेस्तव सर्व साधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करते.

**सुचकः- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले** **अनुमोदकः- इशरत फातेमा अ.शमीम, विनय पाटील**

**विषय क्र. 8** **प्रस्ताव**

प्रभाग क्र.7 मध्ये जूने एनसीसी ऑफीस ते व्यंकटाद्री नगर ,अयोध्यानगरीला जाणारा रस्ता आहे. या रस्त्यावर **30 x 50 =1500** चौ.फुटाचा प्लॉट आलेला असल्यामूळे रस्ता बंद झालेला आहे.या प्लॉटची नोंद मनपात झोन क्र.6 मध्ये पण झालेली आहे. सदरील स्थावर मालमत्ता रस्त्यासाठी संपादन करणे आवश्यक असल्यामूळे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम प्रकरण आठ कलम 77(1) नुसार संपादन करण्यास प्रकरण सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर. सदरील प्रस्ताव याच सभेत मंजुर करुन कायम करण्यात यावा.

**सुचकः- गंगासागर अन्नेवार** **अनुमोदकः - रजिया बेगम अयुब खान**

**विषय क्र. 9** **प्रस्ताव**

नांवामनपा प्रभाग क्र.16 मधील रहिवासी अब्दुल साजिद अब्दुल रशिद हा जन्मापासून येथील रहिवाशी असून त्यांना दुर्दैवाने कर्करोग पिडीत आहे.रोजंदारीवर कुटूंबाची उपजिविका चालते. त्यांच्या पाठीमागे त्यांचा परिवार म्हणजे आई वडील,पत्नी व दोन मुली अशा परिवार आहे. त्याचे कुटंब उघडयावर पडले आहे. तरी बिएसयुपी अंतर्गत त्याला साईट क्र.34 येथे घरकुल देण्यासाठी ही सर्वसाधारण सभा मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- रजिया बेगम अयुब खान** **अनुमोदकः - गंगासागर अन्नेवार**

**विषय क्र. 10** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीत **NUHM** योजने अंतर्गत चार ठिकाणी नविन सेंटर सुरु होणार आहे. तसेच शहरात **Existing** हॉस्पीटल बरेच ठिकाणी चालू आहेत. सदर ठिकाणी महानगरपालिकेतर्फे जनेरिक मेडीकल स्टोअर ( **Generic medical Store** ) सुरु केल्यास ना नफा ना तोटा यातत्वावर गरीब रुग्णांना माफक दरात औषधी उपलब्ध्द होतील.

करीता नविन चार ठिकाणी सुरु होणा-या दवाखान्यात मनपातर्फे जनेरीक मेडिकल स्टोअर (**Generic medical Store**) सुरु करणेकरीता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- वाजिदा तब्बसुम अथर अली खान** **अनुमोदकः - स.विरेंद्रसिंघ गाडीवाले**

**विषय क्र. 11** **प्रस्ताव**

नांवामनपा हदीत फळाची मागणी जास्त असून फळे पिकविण्यासाठी रेपनिंग चेंबरचे तुटवडा आहे. मनपा मालकीची केळी मार्केट येथे असलेल्या मोकळया जागेत तसेच मनपा इतवारा दवाखाना येथे मोकळी असलेल्या जागेत बीओटी किंवा बिएफटी तत्वावर रेपनिग चेंबर बांधण्यास ही नावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- अ.लतिफ अ.मजिद** **अनुमोदकः -चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस**

**विषय क्र. 12** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने डॉ.राम मनोहर लोहिया वाचनपालय स्टेडियम येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र चालविण्यात येत असून सध्याची परिस्थितीत 124 विद्यार्थ्यांची संख्या आहे. दिवसेंदिवस तेथे विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी मागणी वाढत आहे. विद्यार्थ्याची मागणी लक्षात धेवून अशोक नगर येथील महानगरपालिकेच्या जनवाराचा दवाखाना व मनपाकेचे वाचनालय चालू आहे.तेथे पहिल्या मजल्यावर नविन बांधकाम करुन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात यावे.व त्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आथिक मान्यता देणेस्तव प्रस्ताव सादर.

**सुचकः- आनंद शंकरराव चव्हाण** **अनुमोदकः - नवलकुमार पोकर्णा**

**विषय क्र. 13** **प्रस्ताव**

सिडको आंबेडकर चौक ते ढवळे कार्नर पर्यतचा मुख्य रस्त्यावर पुर्ण खडे पडलेले असल्यामूळे नागरीकांना रस्त्यावरून वाहने चालविणे कठिण होवून दररोज अपघात होत आहे. तसचे पादचा-यांना सुध्दा चालणे अवघड झालेले आहे.करीता सिडको आंबेडकर चौक ते ढवळे कार्नर पर्यतचा दुहेरी मुख्य रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी व या रस्त्याच्या दोन्ही बाजुने पादचा-यांकरीता स्वतंत्र फुटपाथ रस्ता करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**सुचक ः- डॉ.ललिता मुकूंद बोकारे (शिंदे)** **अनुमोदक ः- संजय मोरे**

**विषय क्र 14** **प्रस्ताव**

नांदेड नगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा जेष्ठ रिपाई नेते अॅड मा.मा.येवले यांचा अमृत महोत्सवी सत्कार समारंभ 21 जानेवार रोजी मा.माजी मुख्यमंत्री श्री अशोकरावजी चव्हाण याचे शुभहस्ते संपन्न झाला , या अमृत महोत्सव सत्कार प्रसंगी महापौर श्री अ.सत्तार अ.गफुर याचे हस्ते महानगरपालिकेच्या वतीने अॅड मा.मा.येवले यांना मानपत्र देवून गौरविण्यात आले. सदरचे मानपत्राास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतूदीनूसार कार्योत्त्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणे आवश्यक आहे. करीता अड. मा.मा.येवले यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्रास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता ही नावामनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- स.सरजितसिंघ गिल** **अनुमोदकः - चाऊस हसीना बेगम साबेर चाऊस, विनय पाटील**

**विषय क्र. 15** **प्रस्ताव**

मनपा सर्वसाधारण सभेने पारीत केलेल्या ठरावानूसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कडून निधी उपलब्ण्द करुन घेण्यासाठी पारीत केलेल्या ठरावानूसार निधी उपलब्ध्द करण्यासाठी सदर ठराव पारीत करुन याच सभेत कायम करणे बाबत.

**सुचक ः- अनुजा तेहरा** **अनुमोदकः - स.विरेंद्रसिंघ गाडीवाले**

**विषय क्र. 16** **प्रस्ताव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र. 16 नई आबादी आंबेडकरनगर येथे अल्पसंख्याक लोकांची वस्ती आहे.या वस्तीतील गोरगरीब अल्पसंख्याक नागरीकांकरीता नई आबादी भागात लायब्ररीसाठी एक रुमचे बाधकाम करण्यात आलेले असून अद्याप वाचनालय सुरु करण्यात आलेल नाही करीता या रुम मध्ये वाचनालय सुरु करण्याची लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि नांवामना सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते .

**सुचक ः- रजिया बेगम अयुबखॉं** **अनुमोदकः - डॉ.ललिता मुकूंद बोकारे (शिंदे)**

**विषय क्र. 17** **प्रस्ताव**

नावामनपा हदीत वसरणी प्रभाग क्र.36 मधील महादेव मंदिर मार्ग जटाळे,खराणे,गुंजावळे मार्गे काळे गल्लीकडे जाणा'-या रस्त्याचे कॉर्नरचा रस्ता फार अरुंद आहे.त्यामूळे नागरीकांच्या अनेक तक्रारी आहे.आजूबाजूच्या मालमत्ताधारकांच्या खाजगी जागा आहे. रस्ता रुंदकरणे अत्यंत आवश्यक आहे. त्या कॉर्नरच्या मोकळया जागेचे मालक उध्दव हरिहरराव खराणे व इतरांच्या जागा भूंसपादन करुन रस्त्याची 20 फुट रुंदी वाढविण्यात यावी.याबाबतचा ठराव ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचकः- संजय मोरे** **अनुमोदकः -किशोर यादव, श्रीमती कमलाबाई मुदिराज**

**विषयः- 18**

महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 86 दिनांक 14.08.2014 अन्वये 2011 साली घेतलेला जनसंपर्क अधिकारी पदाच्या निर्मितीचा आणि सदर पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचा ठराव रद्द करुन गोविंद करवा यांना सेवेतून बडतर्फ (कायमचे कमी ) करण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक 20.08.2014 रोजी गौंविंद करावा यांना सेवेतून कायमचे कमी करण्याचे आदेश निर्गमीत करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील जनतेसाठी राबवले जाणारे उपक्रम, विविध प्रकारच्या कर वसुली संदर्भातील आवाहन, विविध विभागातील जाहीर प्रगटन, विविध सूचना तसेच महानगरपालिकेतील विविध घडामोडी वृत्तपत्र, दुरचित्रावाणी व इतर माध्यमांव्दारे जनतेपर्यंत पोहचवणे व तक्रारींचा खुलासा करण्यासाठी महानगरपालिकेला जनसंपर्क अधिकारी या पदाची नितांत आवश्यकता आहे. श्री. गोविंद करवा यांची निवड मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार मनपा निवड समिती मार्फत विहित पध्दतीने झालेली असून नियुक्ती पासून त्यांनी सदर पदावर चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. श्री. गोविंद करवा यांनी कामावर पूर्ववत रुजू करुन घेण्याबाबत विनंती अर्जही सादर केलेला आहे. श्री. गोविंद करवा यांच्या सेवेचा अनुभव व त्यांच्या सेवेची महानगरपालिकेला असलेली आवश्यकता लक्षात घेवून तसेच त्यांच्या अर्जावर सकारात्मक पूर्नविचार करुन श्री. गोविंद करवा यांना सेवेत पूर्ववत ठेवणे उचीत वाटते. त्याकरिता महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 86, दिनांक 14.08.2014 चा पूर्नविचार करुन श्री. गोविंद करवा यांना जनसंपर्क अधिकारी पदावर सेवेत पूर्ववत रुजू करण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**महापौर,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.